# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of History

## Assignment

## Session: 2018 – 2019

# INDEX

Name : Kiran Rajendra Adagale

Std : 1st year Div : ________ Roll No : ________

Sub : History

School / College : Yashoda Girl's College

| Sr. No. | Date | Title | Remark | Pg. No. |
|---|---|---|---|---|
| | | 2018 - 2019 | | |

SEAL

# • सम्राट अशोक •

• प्रस्तावना :

प्राचीन भारतातील विशाल आणि विस्तृत साम्राज्यावर सत्ता प्रस्थापित करणारा सम्राट अशोक हा भारताच्या इतिहासातील एक महान मानवतावादी शासक म्हणून ओळखला जातो. कलिंग लढाईतील विजयानंतर त्याने बौद्ध धर्माची दिक्षा घेतली भेरी घोषाचा त्याग करून धम्मघोषाचा अवलंब केला शस्त्रविजय नकारुन धम्मविजय-याचा स्वीकार केला. सत्य, अहिंसा आणि शांततेच्या मार्गाने राज्य कारभार करून सम्राट अशोकाने जगाच्या इतिहासात आपले नाव अजरामर केले. त्याच्या कारकिर्दीत सर्वसामान्य प्रजेच्या मनात सत्य, अहिंसा, स्वातंत्र्यता, समता, बंधुता आणि मानवता ही भावना जागृत होऊन एक राजा, एक राष्ट्र ही संकल्पना उदयास आली होती. त्यामुळे भारतातील इतर सर्व राजे-महाराजे, सम्राट-सुलतान आणि बादशाह यांच्यापेक्षा सम्राट अशोकाचे व्यक्तिमत्त्व अतिशय उज्वल होते.

SEAL

• अशोकाचे प्रारंभिक जीवन:

चंद्रगुप्त मौर्याने आपल्या आयुष्या-च्या उत्तरार्धात जैन धर्माचा स्वीकार

केला. त्यानंतर त्याचा मुलगा बिंदुसार इ.स. पूर्व २९८ मध्ये मौर्य सम्राज्याचा सम्राट बनला. त्याला १६ राण्या आणि १०० पुत्र होते. त्यापैकी राणी सुभद्रांगीचा मुलगा म्हणजे अशोक होय. लहानपणा-पासून तो युद्ध कलेत निपुण होता. त्याच्या क्रुर प्रवृत्तीमुळे आणि आक्रमक धोरणामुळे त्याला चंडाशोक असेही म्हटल्या जात असे. सम्राट बिंदुसारने त्याला आपल्या साम्राज्यातील उज्जैयनी या प्रांताचा प्रांताधिकारी म्हणून नियुक्त केले होते. तेथे असतांना विदिशाची राजकुमारी महादेवी हिच्याशी त्यांचा विवाह झाला होता. मौर्य साम्राज्यातील एक सीमावर्ती प्रांत असते. त्याला तक्षशीला येथे बिंदुसारचा मोठा मुलगा सुशीम हा प्रांताधिताधिकारी होता. त्याचा अत्याचारी राजवटीमुळे तेथील जनतेने विद्रोह केला. सुशीमा या विद्रोहाचा बंदोबस्त करण्यात अयशस्वी झाल्यामुळे बिंदुसारने अशोक त्याला तक्षशिलेला पाठविले. अशोकाने कुटनीतीचा वापर करून अतिशय पराक्रमाने तक्षशिले चे बंड मोडून काढले आणि तेथे शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित केली. त्यामुळे अशोकाच्या कर्तबगारीने प्रभावित होऊन आपल्या-

नंतर अशोक हाच मौर्य साम्राज्याचा सम्राट व्हावा या हेतूने बिंदूसारने अशोकाला आपला उत्तराधिकारी घोषित केले.

## • सम्राटपदाची प्राप्ती:

इ. स. पूर्व २७३ मध्ये सम्राट बिंदूसारचा मृत्यू झाला. त्याने अशोकाला आपला उत्तराधिकारी जाहिर केले असल्यामुळे अशोकाने उज्जयिनीवरून राजधानी पाटलीपुत्र येथे येऊन स्वतःला मौर्य साम्राज्याचा सम्राट घोषित केले. बिंदुसारचा मोठा मुलगा युवराज सुशीम हा सुद्धा स्वतःला सम्राटपदाचा दावेदार समजत होता. त्यामुळे तोही तक्षशिलेवरून पाटलीपुत्र येथे आला. धर्मग्रंथानुसार सतत चार वर्षे चाललेल्या या संघर्षात अशोकाने सुशील आणि ९९ इतर अशा सर्व सावत्र भावांना ठार केले. त्यानंतर आपल्या विरोधकांचा बंदोबस्त करून राधागुप्त आणि यल्लाटक या मंत्र्यांच्या सहकार्याने इ. स. पूर्व २६९ मध्ये अशोकाने मौर्य साम्राज्याचा सम्राट म्हणून स्वतःचा राज्याभिषेक केला.

SEAL

## • कलिंग युद्ध:

कलिंग युद्ध हे सम्राट अशोकाच्या जीवनातील पहिले आणि शेवटचे युद्ध होते.

अशोकाच्या तोसली आणि कलिंग लेखावरून त्याचप्रमाणे तेराव्या शिलालेखावरून कलिंग युद्धाची माहिती मिळते. भारताच्या पूर्व किनाऱ्यावर सध्याच्या ओरिसा आणि आंध्रप्रदेशात महानदी आणि गोदावरी दोआबामध्ये कलिंग हे अतिशय सुपीक-समृद्ध आणि बलाढ्य असे स्वतंत्र राज्य होते. तोसली ही कलिंग राज्याची राजधानी होती. तेथे नंदराज हा चेदी वंशाचा राजा राज्य करीत होता. मॅगस्थेनीजच्या मतानुसार नंदराज जवळ ६०,००० पायदळ, १००० अश्वदळ आणि ७०० हत्तीदळ होते. सम्राट चंद्रगुप्त मौर्य आणि सम्राट बिंदुसार यांच्यापासून त्यांनी कलिंग राज्याचे समर्थ-पणे संरक्षण केले होते. आपल्या राज्याभिषेकाच्या आठ वर्षांनी स्थिरस्थावर झाल्यानंतर अशोकाने कलिंगाचा राजा नंदराज याला कलिंग राज्य मौर्यसाम्राज्यात विलीन करून मांडलिक होण्याचा आदेश दिला. स्वाभिमानी आणि स्वातंत्र्यप्रिय असलेल्या नंदराज त्याचा आदेश न मानल्यामुळे अशोकाने कलिंगवर आक्रमण करण्याचा निर्णय घेतला.

इ. स. पूर्व २६१ मध्ये सम्राट अशोकाने प्रचंड तयारीनिशी कलिंग राजावर आक्रमण केले. मौर्य साम्राज्याच्या विशाल सैन्यासमोर आपला टिकाव

शस्त्र न घेण्याची प्रतिज्ञा केली. अशाप्रकारे कलिंग युध्द सम्राट अशोकाच्या जीवनालाच नाही तर भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारे निर्णायक युद्ध ठरले.

- **अशोकाचा धम्म :-**

सम्राट अशोकाचा धम्म ही एक अतिशय व्यापक स्वरूपाची संकल्पना आहे. अशोकाच्या स्तंभ लेखावरून आणि शिलालेखावरून आपणास अशोकाच्या धम्माची माहिती मिळते. कलिंग युद्धापूर्वी सम्राट अशोक हा शिवाचा उपासक होता कलिंग युद्धानंतर त्याने बौध्द धर्माचा सखोल अभ्यास केल्यानंतर अशोकाच्या असे लक्षात आले की भगवान गौतम बुद्धांनी सांगितलेल्या बौद्ध धम्म हा धर्म नाही तर एक जीवनशैली आहे. परंतु गौतम बुद्धांच्या मृत्यूनंतर बौद्ध धर्म फक्त धर्मग्रंथात विहारापुरताच मर्यादित राहिला. म्हणून बौद्ध धर्माला मूळ स्वरूपात आणण्यासाठी सम्राट अशोकाने शस्त्रविजयाऐवजी धम्मविजय करण्याचे ठरविले. मी भोजन करीत असेल. उद्यानात क्रीडा करीत असेल, राजदरबारात महत्वाच्या कार्यात असेल तरीही

गुप्तहेरांनी मला प्रजेच्या कल्याणाचे कितीहि कार्य केले अशी जनकल्याणकारी भूमिका सम्राट अशोकाने घेतली. यावरून अशोकाच्या धम्म हा बौद्ध तत्वज्ञानावर आधारलेला राजधर्म होता असे लक्षात येते. अशोकाने राजवाडयातील सर्व भोगविलास, मद्यप्राशन मांसाहार आणि शिकारयात्रा बंद केल्या. अन्नछात्रालये, तलाव, विहिरी, धर्मशाळा, दवाखाने, बागा, उद्याने, रस्ते, पाणपोई. आणि वृक्षारोपण इत्यादी लोकहितार्थ कार्य करून बौद्ध धर्म कृतीत उतरवला. गुरुजन आणि वडिलधारी व्यक्तींच्या आदर सन्मान करावा, दास व सेवकांना समानतेची वागणूक द्यावी. सर्वांशी प्रेमाने वागावे प्राणीमात्रावर दया करावी, वाईट प्रवृत्तीपासून दूर रहावे, नैतिक आचरणासाठी आत्म-परिक्षण करावे, सत्य अहिंसेचे पालन करावे, दानधर्म करावा, न्याय, संयम, करुणा, सहनशीलता आणि क्रियाशीलता अंगी बाळगावी असा उपदेश सम्राट अशोकाने आपल्या प्रजेला दिला बौद्ध धर्मावर आधारित, असलेल्या अशोकाच्या या ~~जाट~~ जनकल्याणकारी नीतिला धम्म असे संबोधिले जाते.

SEAL

• मूल्यमापन :-

जगाच्या इतिहासात अनेक थोर-राजे - महाराजे होऊन गेलेत. त्यांच्यात सम्राट अशोकाचे स्थान अनन्यसाधारण समजल्या जाते. ४० वर्षे यशस्वी राज्यकारभार केल्यानंतर इ.स. पूर्व २३२ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. जगाच्या इतिहासात त्यांची एक महान सम्राट (The Great Ashoka) म्हणून नोंद झाली आहे. कलिंग युद्धानंतर बौद्ध धर्माचा स्वीकार करून भिक्षूराज म्हणून त्याने आपले नाव इतिहासात अजरामर केले आहे. सम्राट, शासक, महान विजेता, उत्तम प्रशासक, प्रजाहित दक्ष, उपासक, धर्मप्रचारक, धर्म सहिष्णुतावादी म्हणून सम्राट अशोकाचे कार्य अद्वितीय आहे. त्याच्या या अभूतपूर्व कार्यामुळे त्याला देवनाम्प्रिय व प्रियदर्शी राजा अशोक ही पदवी सार्थ ठरते. एक राजा असूनही ऋषीसारखे जीवन जगत असल्यामुळे त्याला राजर्षी असेही म्हटल्या जायचे. हजारो राजांमध्ये सम्राट अशोकाचे स्थान म्हणजे दैदिप्यमान ताऱ्याप्रमाणे आहे. असे मत एच.जी. वेल्स या इतिहासकाराने सम्राट अशोकाबद्दल व्यक्त केले आहेत.

SEAL

Principal
Yashoda Girls Arts & Commerce College, Nagpur-15.